आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१७ जून २०२५ - मंगळवार

## ठळक बातम्या

- महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९ला मंत्रिमंडळाची मंजुरी / ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रं उभारण्यासाठी महावेध प्रकल्पाला मुदतवाढ

- सत्तेसाठी भाजपासोबत जाणाऱ्यांचा विचार न करता नेतृत्वाची नवी फळी तयार करु, अशी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची स्पष्टोक्ती

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कॅनडामध्ये कनानास्किस इथं होणाऱ्या G-7 शिखर परिषदेत सहभागी होणार

- सृजनशील आणि सांस्कृतिक रेडिओ महोत्सवाचं येत्या शनिवारी मुंबईत आयोजन

**आणि**

- महिला एकदिवसीय क्रिकेटमधे आयसीसीच्या फलंदाजांच्या क्रमवारीत भारताची स्मृती मंधाना अव्वल स्थानी

**<><><><><>**

महाअ‍ॅग्री-एआय (MahaAgri-AI), अर्थात महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९ला राज्य मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या या आणि इतरही महत्वाच्या निर्णयांविषयी एकूया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड - VC (मंत्रिमंडळ निर्णय)**

*(महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाला मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्यामुळे कृषि क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून परिवर्तन घडवता येईल. कृत्रिम बुद्धीमत्ता, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धीमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन, संगणकीय दृष्टीक्षमता, रोबोटिक्स, पूर्वानुमान विश्लेषण यांचा वापर करत, राज्यातले अ‍ॅग्रीस्टेक, महा-अ‍ॅग्रीस्टेक, महावेद, क्रॉपसॅप, अ‍ॅगमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डिबीटी यांसारखे प्रकल्प पुढं न्यायला मदत होणार आहे. केंद्र सरकारच्या WINDS, म्हणजे Weather Information Network Data System प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रं उभारली जाणार आहेत. यासाठी महावेध प्रकल्पाला ५ वर्षांची मुदतवाढ द्यायचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला. आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुप्पटीनं वाढ, हयात जोडीदारालाही मानधन मिळणार, मुंबई मेट्रो मार्ग-२अ, २ ब आणि ७ या मेट्रो प्रकल्पांकरिता एशियन डेव्हलपमेंट बँक आणि न्यू डेव्हलपमेंट बँक यांच्याकडून घेतल्या*

*जाणाऱ्या कर्जाला मुदतवाढ, विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्प आता "बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा" या तत्त्वावर हाती घ्यायला मान्यता, इत्यादी निर्णयही या बैठकीत झाले.)*

**<><><><><>**

सत्तेसाठी भाजपासोबत जाणाऱ्यांचा विचार न करता नेतृत्वाची नवी फळी तयार करु, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज  पिंपरी चिंचवड इथं पक्षाच्या मेळाव्यात बोलत होते. कुणाशीही संबंध ठेवू, पण भाजपाशी संबंधित असलेले लोक काँग्रेसच्या विचारांचे असू शकत नाहीत. त्यामुळे अशा संधीसाधूपणाचं राजकारण आपल्याला प्रोत्साहित करायचं नाही", असं ते म्हणाले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत आपण सगळ्या जागा लढवू, आपल्या सोबत जो कोणी, महिला, तरुण येत असेल त्यांचं स्वागत आहे. आपण त्यांना संधी देऊ, या नव्या नेतृत्वाच्या माध्यमातून विकासाचं काम करुया, त्यासाठी तयारीला लागा, असं आवाहन शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कॅनडाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी आज कॅलगरी इथं पोहोचले. कनानास्किस इथं आयोजित G-7 शिखर परिषदेत ते सहभागी होत आहेत. कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्यासह सदस्य देशांच्या इतर नेत्यांबरोबर ते द्विपक्षीय चर्चा करतील. त्यानंतर प्रधानमंत्री मोदी उद्या क्रोएशियाची राजधानी झाग्रेब इथं पोहचतील.

**<><><><><>**

गेल्या ११ वर्षांच्या कार्यकाळात केंद्रसरकारने सार्वजनिक आरोग्यसेवेसाठी भरीव उपाययोजना केल्या आहेत. ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**- व्हॉईस कास्ट-**

*(सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्वांनी प्रेरित होऊन भारताने गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. त्यात प्रामुख्याने भारताच्या आरोग्य सेवेचा समावेश आहे. आयुष्मान भारतसारख्या*

*प्रमुख उपक्रमांनी जवळजवळ ५५ कोटी लोकांना आर्थिक संरक्षण दिलं. आहे. आयुष्मान वय वंदना योजनेंतर्गत ७० वर्षं आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य हमीचे योजनेचे फायदे देण्यात आले आहेत. आयुष्मान भारत डिजिटल मिशनने आरोग्यसेवेचं आधुनिकीकरण केलं असून ७८ कोटींहून अधिक आयुष्मान भारत आरोग्य खाती तयार झाली आहेत. आयुष्मान भारत अंतर्गत येणाऱ्या आरोग्याशी संबंधित पायाभूत सुविधांच्या योजनेमुळे आरोग्य सेवेचा विस्तार झाला आहे. ईशान्येकडच्या राज्यांमध्ये एम्स रुग्णालयांची स्थापना हे आरोग्य सेवेसाठी सरकारच्या वचनबद्धतेचं प्रतीक ठरलं आहे. जगभरात कोविडची साथ पसरली असतानाही भारताने त्याला रोखण्यासाठी विमानतळावरच्या तपासणीपासून ते लॉकडाऊन जाहीर करणं, टास्क फोर्सची स्थापना करणं आणि लस निर्मिती पर्यंतची मजल मारली. गेल्या ११ वर्षांच्या काळात सर्वांसाठी आरोग्य या तत्वावर सरकारनं आरोग्य सेवेचा विस्तार केला असून त्याच्या गुणवत्तेत सुधारणा घडवून आणली आहे.)*

**<><><><><>**

यंदाच्या आषाढी एकादशीला पंढरपूर इथं विठ्ठल-रुक्मिणीच्या शासकीय महापूजेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांना श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीनं मुंबईत त्यांची भेट घेऊन निमंत्रण दिलं आहे. येत्या ६ जुलै रोजी पहाटे २ वाजून २० मिनिटांनी मुख्यमंत्री फडनवीस सपत्निक, तसंच मानाच्या वारकरी जोडप्यासह विठ्ठल-रुक्मिणीची महापूजा करतील.

**<><><><><>**

पंढरपूरला चंद्रभागा नदीवरचा जुना धोकादायक स्थितीतला दगडी पूल काढून त्याठिकाणी नवीन समांतर पूल उभारण्यात येईल असं सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज सांगितलं.

**<><><><><>**

जागतिक संगीत दिनानिमित्त येत्या २१ जून रोजी देशातला पहिला सृजनशील आणि सांस्कृतिक रेडिओ महोत्सव तसंच महाराष्ट्र आशा रेडिओ गौरव पुरस्कार सोहळा मुंबईत होणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांनी वार्ताहर परिषदेत आज दिली. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस उपस्थित राहणार आहेत. राज्याची सांस्कृतिक, ऐतिहासिक परंपरा जपण्याचं काम रेडिओनं केलं असून देशाच्या स्वातंत्र्यापासून ते महाराष्ट्राच्या निर्मितीपर्यंत सर्व ऐतिहासिक घटनांचा रेडिओ साक्षीदार आहे, असं शेलार यावेळी

म्हणाले. रेडिओच्या या कार्याचा गौरव करण्यासाठी या कार्यक्रमाचं आयोजन केल्याचं शेलार यांनी सांगितलं.

<><><><><>

आयसीसीच्या महिला एकदिवसीय क्रिकेटमधे फलंदाजांच्या क्रमवारीत भारताच्या स्मृती मंधाना हिनं अव्वल स्थान पटकावलं आहे. तिच्याकडे ७२७ गुण आहेत. दक्षिण आफ्रिकेच्या लॉरा वोल्वार्ड हिची दुसऱ्या क्रमांकावर घसरण झाली असून तिच्यासह इंग्लंडची सायव्हर ब्रंट ही संयुक्तरित्या दुसऱ्या स्थानावर आहे. स्मृतीनं जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान दुसऱ्यांदा पटकावलं आहे.

<><><><><>

अहमदाबाद विमान अपघातातल्या १६२ मृतांची डीएनए चाचणीद्वारे ओळख पटवण्यात आली आहे. गुजरातचे गृहराज्यमंत्री हर्ष सांघवी यांनी ही माहिती दिली.

दरम्यान, या विमानाचे कप्तान सुमीत सभरवाल यांच्या मृतदेहाचा डीएनए जुळल्यानंतर त्यांचं पार्थिव त्यांच्या कुटुंबियांकडे सोपवण्यात आलं. मुंबईत आज त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले. याच अपघातात मृत्यूमुखी पडलेली पनवेलची मैथिली पाटील हिच्यावरही उरण जवळ न्हावा इथं आज अंत्यसंस्कार करण्यात आले. अपघातग्रस्त विमानात मैथिली सेविका म्हणून कार्यरत होती.

विमानाचे सहवैमानिक क्लाईव्ह कुंदर, सेविका श्रद्धा धवन आणि साईनीता चक्रवर्ती यांच्या पार्थिवांची ओळख पटल्यानंतर मुंबईत त्यांचे अंतिम संस्कार झाले. विमानातल्या इतर कर्मचाऱ्यांच्या तसंच अनेक प्रवाशांच्या मृतदेहांची ओळख पटवण्याचं काम अद्याप सुरु आहे.

<><><><><>

कोकण विभागात भरती-ओहोटी आणि चक्रीवादळांमुळे विविध योजनांच्या लाभ क्षेत्रातली जमीन नापीक होत आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन, बृहत

आराखड्यातल्या नवीन योजनांची कामं तातडीनं हाती घ्यावीत असे निर्देश रोजगार हमी योजना मंत्री भारत गोगावले यांनी आज दिले. गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले.

भविष्यकालीन धोके लक्षात घेता नव्या खारभूमी योजनांची कामं मोठ्या प्रमाणात हाती घ्यायला हवीत, असं ते म्हणाले.

<><><><><>

पुणे जिल्ह्यात मावळ इथं पूल दुर्घटनेनंतर सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या साकवांची तातडीनं तपासणी केली, त्यामध्ये ८१३ साकवांपैकी केवळ १६९ साकव सुस्थित असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र खेबुडकर यांनी दिली.

४०६ साकवांची दुरुस्ती करणं आवश्यक असून त्यासाठी ३३ कोटी १४ लाख रुपये, तर ३१३ ठिकाणी नवीन साकव बांधणं गरजेचं आहे. त्यासाठी ९७ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

गोंदिया जिल्ह्यात यावर्षी झालेल्या सारस पक्ष्यांच्या गणनेत त्यांची संख्या वाढल्याचं दिसून आलं आहे. राज्यात गोंदिया जिल्ह्यात प्रामुख्यानं आढळून येणाऱ्या पक्ष्यांच्या संख्येत गेल्या तीन चार वर्षात घट दिसली होती, मात्र वन विभागानं सारस पक्ष्याच्या संवर्धनासाठी केलेल्या विशेष प्रयत्नांमुळे यावर्षी त्यांची संख्या तेरानं वाढून आता छत्तीसपर्यंत पोहचल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

<><><><><>

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या पालघर जिल्ह्यातल्या बोईसर इथल्या प्रस्तावित रेल्वे स्थानकावर गाडीच्या रुळांना आधार देणाऱ्या पहिल्या लेव्हल स्लॅब

कास्टिंगचं काम पूर्ण झालं आहे. असे ९ स्लॅब या ठिकाणी बांधले जातील. हे रेल्वे स्थानक ४२५ मीटर लांबीचं असेल, तर अंदाजे १७ हजार चौरस मीटर क्षेत्रावर त्याचा विस्तार असेल.

या दोन मजली रेल्वे स्थानकात प्रवाशांच्या सोयीसाठी अद्ययावत सुविधा असतील.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकण आणि मध्य महाराष्ट्रात जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. रत्नागिरी, पुणे, सातारा आणि कोल्हापूरचा घाट परिसर, तसंच सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी पुढले २४ तास ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

//<><><><><>//